# फलभार

गिरीश



म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. न. २५५४.

REFBK-0005145

पान १३४

दा. गं.
५१४५

ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

# फलभार

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | किरण ( गद्यपद्य–मण्डळ ) | ०४ |
| २ | काव्यविचार ( काव्यविषयक निबन्ध–मण्डळ ) | १ |
| ३ | उषा ( पद्य–मण्डळ ) | ०१२ |
| ४ | मधुमाधव ( पद्य–घाटे–माधव जूलियन् ) | ०१२ |
| ५ | शलाका ( गद्यपद्य–मण्डळ ) | १ |
| ६ | विरहतरङ्ग ( पद्य–माधव जूलियन् ) | ०८ |
| ७ | कला ( खण्डकाव्य–गिरीश ) | ०६ |
| ८ | नाट्यरूप महाराष्ट्र ( ऐतिहासिक प्रवेश–विठ्ठलराव घाटे ) | १ |
| ९ | छन्दोरचना ( मराठी वृत्तशास्त्र, प्रो. मा. त्रि. पटवर्धन ) | २ |
| १० | प्रभा ( पद्य–मण्डळ ) | ०८ |
| ११ | सुधारक ( खण्डकाव्य–माधव जूलियन् ) | १०८ |
| १२ | आम्बराई ( खण्डकाव्य–गिरीश ) | १ |
| १३ | यशोधन ( पद्य–यशवन्त ) | १०८ |
| १४ | उमर खय्यामच्या रुबाया ( पद्य–प्रो. मा. त्रि. पटवर्धन ) | १०८ |
| १५ | भावमन्थन ( पद्य–यशवन्त ) | ०८ |
| १६ | काञ्चनगङ्गा ( पद्य–गिरीश ) | १०८ |
| १७ | द्राक्षकन्या ( पद्य–माधव जूलियन् ) | ०१२ |
| १८ | बन्दीशाळा ( खण्डकाव्य–यशवन्त ) | १ |
| १९ | गज्जलाञ्जलि ( पद्य–माधव जूलियन् ) | १ |
| २० | जयमङ्गला ( खण्डकाव्य–यशवन्त ) | १ |
| २१ | फलभार ( पद्य–गिरीश ) | ०१२ |

पत्ता–५६८ नारायण, गायकवाड वाडा, पुणें २.

रविकिरणमण्डळाचें २१ वें पुस्तक

# फलभार

गिरीश

याच्या निवडक स्फुट कविता

सङ्ग्रह २

REFBK-0005145

३० मे १९३४

फलटण

किंमत १२ आणे

# रविकिरणमण्डळ

गजानन त्र्यम्बक माडखोलकर

यशवन्त दिनकर पेण्ढरकर

श्रीधर बाळकृष्ण रानडे, एम्. एस्सी

[ सौ. मनोरमाबाई रानडे, बी. ए. ]

विठ्ठल दत्तात्रय घाटे एम् ए , बी टी., टी. डी.

माधव त्रिम्बक पटवर्धन, एम्. ए.

दत्तात्रय लक्ष्मण गोखले, एम्. ए., बी. टी.

शङ्कर केशव कानेटकर, एम्. ए.


भाषान्तरासहित सर्व हक्क कर्त्याकडे

प्रकाशक— मधुसूदन शङ्कर कानेटकर,

५६८ नारायण, गायकवाड वाडा, पुणें २

मुद्रक—रा. रा. अनन्त विनायक पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, घ. नं.

९३६।३ भाम्बुर्डा पेठ, पुणें सिटी.



श्रीमन्त नानासाहेब महाराज

अधिपति, सं फलटण



श्रीमन्त स. सौ. मा लक्ष्मीदेवी राणीसाहेब

स. फलटण

श्रीमन्त कॅप्टन

**मालोजीराव नानासाहेब नाईक निम्बाळकर**

अधिपति, सं फलटण

श्रीमन्त सकलसौभाग्यसम्पन्न

मातु:श्री **लक्ष्मीदेवी राणीसाहेब**, सं. फलटण

व प्रियशिष्य

श्रीमन्त **राजकुमार** आणि **राजकुमारी**

यांस

**प्रेमादरपूर्वक अर्पण**

# गिरीशकृत पुस्तकें

## अभागी कमल

[ खण्डकाव्य–आवृत्ति दुसरी ]

...... " हें काव्य हृदयङ्गम आहे. विधवेच्या करुण कहाणीचें चित्र अन्तरङ्गांत उठविण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे. त्यांतले काही भाग तर मनाला चटका लावून सोडणारे आहेत. भाषा सुबोध असून वाचतां वाचतां अर्थ मनांत उतरला जातो. वर्णनांत अतिशयोक्ति आहे तथापि वस्तुस्थितीची जाणीव करून देऊन मनांत तळमळ उत्पन्न करण्यास तिची मदत होईल "

—प्रो. धोण्डो केशव कर्वे, बी. ए.

## कला

[ खण्डकाव्य ]

...... " अभागी कमल या लोकप्रिय काव्याप्रमाणेंच या काव्याची रचनाहि सफाईदार व सौष्ठवपूर्ण आहे.. नायकनायिकेच्या सौन्दर्यप्रेमापेक्षां त्यांच्या परस्पर प्रेमाचेंच चित्र या काव्यांत अधिक तन्मयतेनें रेखाटलेलें आहे...एक कथनकाव्य या दृष्टीनें हें काव्य निःसंशय सुन्दर असून, प्रेमी जीवांच्या निराशेचें यात केलेलें वर्णनहि हृदयङ्गम आहे. गिरीशांचे शब्द नेहमींच रेशमाच्या धाग्यासारखे पीळदार पण नाजुक असतात "...

—महाराष्ट्र नागपुर.

## आम्बराई

[ खण्डकाव्य ]

......" सामाजिक व राजकीयदृष्ट्या खालच्या वर्गांतील लोकाची उन्नति जेव्हा होईल तेव्हा होवो, नाटकें व कादम्बऱ्या यांच्या क्षेत्रांत तरी त्यांचे यांना योग्य हक्क ज्या दिवशीं मिळतील तो ललितवाङ्मयाच्या दृष्टीनें सुदिनच म्हणावा लागेल. येथें नमूद करण्यास आनन्द वाटतो कीं ' गिरीश ' त्यांच्या ' आम्बराई ' काव्यांत, खरे खालच्या वर्गांतील लोक, त्यांचीं खरीं सुखदुःखें, त्यांचे खरे विचार, त्यांची खरी भाषा इत्यादिकांची ओळख पटते. "

प्रो. वा. म. जोशी, एम्. ए. ( वि. विस्तार )

## काञ्चनगङ्गा

### [ स्फुट कविता ]

... .. " गिरीश हे एक उत्तम प्रकारचे काव्यशिल्पी आहेत...त्यांचें काव्य गङ्गौघाप्रमाणें शान्त, उषेप्रमाणें रम्य आणि सन्ध्यासङ्गीताप्रमाणें मधुर वाटतें. ते जसे उत्तम शिल्पी तसेंच उत्तम चितारीहि आहेत.. त्यांच्या कवितेंत स्वतःच्या सुखदुःखापेक्षां परक्यांच्या सुखदुःखांचींच चित्रें अधिक चितारलेलीं आढळतात....त्यांच्या इतकी शुद्ध, सुन्दर, प्रमाणबद्ध व श्रवणमधुर अशी कविता विद्यमान कवींपैकीं फारच थोड्या कवींच्या हातून निर्माण झालेली आहे " .

—गं दे खानोलकर ( प्रगति )

# अनुक्रमणिका


| | पान |
|---|---|
| नजराणा | |
| १ शारदालक्ष्मी | १ |
| २ विरही | २ |
| ३ श्रीज्ञानेश्वर | ४ |
| ४ जिव्हाळा | ६ |
| ५ पूजास्थान | ८ |
| ६ क्षण भेटलों | ९ |
| ७ अनुक्त प्रीति | १० |
| ८ ओवाळणी | ११ |
| ९ तेढ | १२ |
| १० जीवितेश्वरीस | १३ |
| ११ जादुगिरी | १४ |
| १२ एकेरी सम्बोधन | १५ |
| १३ उध्वस्त संसार | १७ |
| १४ तन्मयता | १९ |
| १५ स्मृतिस्थळ | २१ |
| १६ रसिक सशयग्रस्ता | २३ |
| १७ संशोधकास | २६ |
| १८ खुळा पाऊस | २७ |
| १९ मङ्गलाशीर्वाद | २९ |
| २० होळ—करास | ३१ |
| २१ धर्मवीर | ३३ |
| २२ हिन्द्वन्दना | ३५ |

| नजराणा | पान. |
|---|---|
| २३ माझी शाळा | ३६ |
| २४ ध्येयदर्शन | ३८ |
| २५ चहाचें तबक | ३९ |
| २६ आनन्दांतील दुःखाश्रु | ४० |
| २७ प्रियदर्शन | ४२ |
| २८ आकाशलिम्ब | ४४ |
| २९ नाजुक ओढ | ४५ |
| ३० भलरी | ४६ |
| ३१ आदर्श | ४८ |
| ३२ शोध | ५१ |
| ३३ औक्षण | ५३ |
| ३४ अनुताप | ५४ |
| ३५ लौकिकांत अलौकिक | ५५ |
| ३६ उपकार | ५६ |
| ३७ शिक्षा | ५७ |
| ३८ श्रीमन्ती | ५८ |
| ३९ नैवेद्य | ५९ |
| ४० राजगीत | ६० |

| नजराणा | | | | पान. |
|---|---|---|---|---|
| २३ माझी शाळा | .. | .. | ... | ३६ |
| २४ ध्येयदर्शन | .. | ... | ... | ३८ |
| २५ चहाचें तबक | . | | | ३९ |
| २६ आनन्दांतील दुक्खाश्रु | . | . | .. | ४० |
| २७ प्रियदर्शन | ... | ... | ... | ४२ |
| २८ आकाशलिम्ब | ... | ... | ... | ४४ |
| २९ नाजुक ओढ | .. | .. | ... | ४५ |
| ३० भलरी ... | ... | .. | .. | ४६ |
| ३१ आदर्श ... | .. | ... | .. | ४८ |
| ३२ शोध ... | .. | ... | .. | ५१ |
| ३३ औक्षण ... | ... | ... | .. | ५३ |
| ३४ अनुताप ... | ... | .. | .. | ५४ |
| ३५ लौकिकांत अलौकिक | ... | . | . | ५५ |
| ३६ उपकार ... | .. | | ... | ५६ |
| ३७ शिक्षा ... | .. | ... | . | ५७ |
| ३८ श्रीमन्ती ... | ... | ... | ... | ५८ |
| ३९ नैवेद्य ... | .. | ... | .. | ५९ |
| ४० राजगीत ... | ... | ... | .. | ६० |

# नजराणा

परिचयानें जडलेलें प्रेम सहवासानें दृढ होतें, पण त्याबरोबरच वियोगकाली होणारें दुःखहि तितक्याच अधिक तीव्रतेनें जाणवतें, असा अनुभव आहे अशा वेळीं मनाची काही तरी समजूत घालून, त्याचें समाधान करावें लागतें आज पुढे करीत असलेला नजराणा म्हणजे अशाच प्रकारचें एक समाधान आहे

श्रीमन्त **मालोजीराव नानासाहेब नाईक, निम्बाळकर** अधिपति, सं. फलटण यांचें राजघराणें मराठ्यांच्या इतिहासांत अत्यन्त जुनें, उज्ज्वल व नामवन्त असें आहे. अशा प्रथितयश घराण्यातील गादीची शैक्षणिक सेवा करण्याचा मला योग आला, ही गोष्ट मला अभिमानाची वाटते या अवधींत श्रीमन्त **महाराजसाहेब** व श्रीमन्त स. सौ. मा **राणीसाहेब महाराज** यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या रसिकतासौजन्यादि सद्‌गुणाचें कृपाछत्र मला लाभलें. या कृपाछत्राच्या सावलींत फलस्थानांत वावरत असताना वेळोवेळीं ठिकठिकाणीं आढळलेलीं फळें मी वेंचलीं व फलस्थानांतील माझ्या स्मृति सङ्कलित स्वरूपात रहाव्यात, म्हणून त्याची ही मी रास शिगविली.

फलटण हें नुसतें फलस्थान नसून, तें एक वाङ्मयस्थान आहे. महानुभावीयाचें तें एक पवित्र क्षेत्र आहे व त्याच्या वाङ्मयात त्याचा उल्लेख ' फलठान ' या नांवानें केलेला आढळतो वाङ्मयनिर्मितीची ही परम्परा येथें आजतागायत चालू आहे व माझ्या हातून येथे जी थोडीफार वाङ्मयनिर्मिती झाली त्याचें श्रेय स्थानिक साहित्यिकांनी चालू ठेवलेल्या या परम्परेस व त्यांच्याकडून मला मिळालेल्या जिव्हाळ्याच्या सहानुभूतीस आहे या साहित्यिकांमध्यें ' महाराष्ट्र शाकुन्तला 'चे विद्वान् लेखक रा. ब. के. वि. गोडबोले, दिवाण स. फलटण यांचा उल्लेख प्रामुख्यानें करणें जरूर आहे. त्याचप्रमाणे या भावगीतांचा वेळोवेळी गौरव केल्याबद्दल सुप्रसिद्ध डॉक्टर रा. ह. भडकमकर व रावसाहेब भा. ल. लिखिते यांचाहि साभार उल्लेख करणें जरूर आहे

प्रस्तुत पुस्तकांतील भावगीतांपैकीं बहुतेक भावगीतें मी येथेच लिहलेलीं असून काही अगदीं थोडीं पुण्यास लिहलेलीं आहेत, आणि म्हणून या दोन्ही स्थळांचे स्मृतिसम्बन्ध डोळ्यापुढे उभे करणारें ' पुण्यफल हें नाव या पुस्तकास द्यावें

असें वाटलें. तोंच माझ्या एका स्नेह्यांनीं यास ' फलभार ' हें नाव द्यावें असें सुचविलें. स्नेह्यांची इच्छा हेंच पुण्यफल असल्यानें मी ' फलभार ' हेंच नांव कायम केलें व तें या सङ्ग्रहास दिलें.

या पूर्वी मी आपलीं ' अभागी कमल ' ' कला ' ' आम्बराई ', व ' काञ्चनगङ्गा ' हीं पुस्तकें प्रसिद्ध करून रसिकांची सेवा केलेली आहे. आजहि हें पुस्तक रविकिरण-मण्डळाचें २१ वें पुस्तक म्हणून प्रसिद्ध करून त्याच्या सेवेस मी हजर रहात आहे. आम्बराईप्रमाणेंच फलभारानेंहि मराठ्यांच्या राजधानीच्या गावीं प्रकाशित व्हावें हा योगायोग सुखद वाटतो.

या नजराण्यांतील फळें रुचीला कशीं आहेत, हें मला माझ्यानें सांगतां येणार नाही, पण तीं भक्तीनें वेंचून आणून, आपलेपणानें पुढे ठेवलेलीं आहेत, एवढा निर्वाळा मी देऊं शकेन. राजाच्या भेटीस रिक्त हस्तानें जाऊं नये म्हणून, हा नजराणा मी तयार केला आहे. त्यास श्रीमन्तांनीं आपल्या हस्तस्पर्शानें गोड करून घ्यावें, म्हणून मी तो सर्वांच्या सवेसाठीं अनावृत करण्याची परवानगी घेतों.

रविवार २० मे १९३४ }
फलटण } गिरीश

## शारदालक्ष्मी

चाल–ब्रह्मसुता कविता– [ सुमन्त ]

काय करूं तुलना । यांची ॥ ध्रु० ॥
एक शारदा, लक्ष्मी दुसरी
देती सञ्चलना १
कल्पनीय ही शिल्प उभविते
जड ती आभरणा २
प्रेमळ अश्रू जीवन हिचें
मौक्तिक तिज अस्ना ३
बघतां हिजला भाव उसमळे
ती फिरवी स्वमना ४
रसमय वाणी अमृत हिची दे
ती सुवर्णवचना ५
भावसृष्टि हिज, व्यवहारी तिज
तुकवि सदा माना ६
म्हणुन हृदय हिज, शिर तिज अर्पुन
विनत करी नमना

२९ मे १९३२
फलटण

## विरही

चाल- प्रतिकूल होइल कैसा

तुझ्यावीण अन्तरीची प्रतिभा फुलेना ॥ ध्रु० ॥

उदासलों हृदयांत
शून्य वाटे वस्तुजात
ढगाळलीं दिनरात
काय करूं लतिकेची कळी उमलेना ! १

दाटे हुरहूर मनीं
सूर लागेना कवनीं
ऐकू ये न वीणाध्वनि
सारङ्गीची तार तारेसङ्गतीं जुळेना ! २

सौन्दर्या ये अवकळा
बेसूरला गोड गळा
विरूपली चित्रकळा
विरहानें काय सृष्टी आज ही डुलेना ? ३

## फलभार

मारूं कोठली भरारी
जाऊं कसा स्वर्गदारीं
गात्रें पाङ्गुळलीं सारीं
चण्डोलाची रागदारी कण्ठांत खुलेना ! ४

भावनेच्या सागरात
झेपावून अन्तरांत
शिम्पल्यात मृदु हात
घालूनीया मोती घ्याया मन हें भुलेना ! ५

तुझ्यावीण हीन जिणें
काहीतरी मर्मे उणें
समृद्धीचें तुझें देणें
जयासङ्गें दृश्यादृश्य विश्वही तुलेना ६

होतों तरी अन्तर्मुख
सेवायास भेटसुख
सार माझी रुखरुख
तुझ्या कृपेवीण माझें हृदय झुलेना ७

३० जुलै १९३०
फलटण

## श्री ज्ञानेश्वर

जाति—बालमुकुन्द

तव चरणा श्रीज्ञानेशा करि भावें वन्दना ॥ ध्रु० ॥

वैराग्य तीव्र आचरुनी
श्रीगीतामृत विस्तरुनी
पाजिली सुधा नव पात्रीं, तुरवाया बन्धना १

तेजाची सुन्दर वाणी
मधु अनुभूतीचीं गाणीं
ऐकून भक्तिभावानें करि हृदय स्पन्दना २

शब्दफुलें भावार्थाचीं
पसरवुनी परिमळवीची
शोधून हृदय भजकांचें, लाजविती चन्दना ३

फलभार

ओवीचा मन्जुळ छन्द
प्राकृतांस दे आनन्द
सकलांस लाविली गोडी, निजभाषामण्डना ! ४

महिषानें म्हटला वेद
द्वैताचा झाला छेद
बद्धांच्या जीवा लागे मग दुसरा छन्द ना ५

चैतन्य किती वेंचावें !
ज्ञानास किती मापावें !
भक्तीनें तुकवी माथा मी, हृदयानन्दना ! ६

स्थळ प्रत
सं. .. न. ... ता. ...

२१ नोव्हेंबर १९३०
फलटण

## जिव्हाळा

जाति—वासरी

तूंच एक अन्तरास दाविला जिव्हाळा
भागली तहान तीव लागली जिवाला ॥ ध्रु० ॥

मन तृषार्त जाहले
जळ समोर भासले
धावतांच लोटल्या चहूंकडून ज्वाळा ! १

भोवती कडू जलाल
धावया सुरा कलाल
अमृत कोण ओपणार त्यांत बालकाला ! २

## फुलभार

पसरलीं फुलें विषार
सुरस कुठुन लाभणार !
लाभली परी तुझ्याच मधुर पुष्पमाळा ३

अन्तरङ्ग खोललेंस
मधुरभाव मिळविलेस
सागरास मिळविलास सागरी उमाळा ४

भगीरथ प्रयत्नवाद
करुनि पावलों विषाद
गाङ्ग जळ तुझ्यामुळेंच वर्षलें स्वभाळा ५

स्रोत वाहुं दे असाच
पूत मज करील साच
जोडणें अता कशास अन्य मी जिव्हाळा ! ६

२३ आक्टोबर १९३१
कुरुन्दवाड– फलटण

## पूजास्थान

गज्जल– तुङ्गभद्रा– त्रिगणी– अपूर्ण

प्रेम केलें काय झाला हा गुन्हा
        दोषुनी, आता सुधारे का पुन्हा
जाहली जी अन्तराची काहली
        काय वाटे दण्ड झाला तो उणा
द्यावया शिक्षा म्हणूनी आणखी
        मूर्तिपूजा काढिसी माझी पुन्हा
अन्तराचा धर्म त्यानें पाळिला
        बोल याचा लावणें कोणी कुणा
स्नेह जाणे स्नेहभाषा आपुली
        स्नेह माझा त्यांतुनी आहे जुना
पूजनें या आजवेरी तोषलों
        काय देव्हारा अतां पाहूं सुना !
प्रेय तूझें तेंच माझें जीवनीं
        तोषतां तूं भाव माझा हो दुणा
त्यागितों सर्वस्व आता संयमें
        प्रीत जाणे त्यागभावाच्या खुणा
ही पहा काढून मूर्ती टाकिली
        थोर पूजास्थान मी मानी गुणा

१४ मार्च १९३९
फलटण

## क्षण भेटलों

गज्जल– सुनीत वृत्त– गीतिका

नजरेंतली तव मोहनी मज थाम्बवी पथिं भारुनी
वळुनी पुन्हा तव पाहणें शर जाय गे उरिं मारुनी

क्षण भेटलों, वरसून तूं करणार सेक सुधामय
वदणार जें हंसणें तुझें कथि गोड अन्तरिं जाउनी

क्षण थाम्बलीस कथावया मज काय़सें, मधुरस्वरे !
अडले जरा तव शब्दही अधर प्रकम्पित होउनी

क्षणि अन्य पाउल वाजलें; दचकून तूं मग पाहिलें
वच कम्पिताधरिं राहिले बधशीं वळून चपापुनी

मुखिं घर्मबिन्दुकणावली लव गालिं आरुण रक्तिमा
चपलेक्षणीं लपलीस तू मुरडून कीं बिजली घनीं !

तम लोचनांत दुणावलें; क्षत अन्तरीं सखि जाहलें
उचले न पाउल चञ्चले, मम जाय चित्त विदारुनी

विमनस्कता हृदिं साठली, विरली हवेंत वचें तुझीं
परि गोड अस्फुट हासणें रमतों अता मनिं आणुनी

८ ऑगस्ट १९२३
पुणें

## अनुक्त प्रीति

गज्जल-वृत्त-वारुणी

मुग्धता माझी तुझ्या कां लागणी लावी जिवाला ?
काय बोलू प्रीत ? त्यानें जीव कोणाचा निवाला ?
अन्तरङ्गीं गाढ माझ्या जे स्वभावें सांठलेलें
वाच्यता त्याची करावी वेड हें नाहीं मनाला
सांठलीं मोत्यें तळाशीं भाव नाचे अन्तरङ्गीं
सागरें का दाविलें हें गूज बोलूनी कुणाला ?
गन्ध गेला दर्वळूनी पाचवी गुम्फेंत पानीं
काय चांफा बोलुनी, पावित्र्य त्याचें ने लयाला ?
गीत जें जन्मास आलें प्रस्फुरूनी भावयोगें
काय त्याचा बोलुनी अन्यास दावावा उमाळा ?
तेज रत्नीं, गन्ध पुष्पीं, झङ्कृती वीणेंतुनी वा
मुग्धतेनें सेवितांना, शान्ति लाभे अन्तराला
तेज वा सौगन्ध, गाणें, होउनी ऐसें मिळावें
भावनेशीं मी तुझ्या हा एक जीवाला जिव्हाळा
सन्निधीं वा दूर कोठें राहिलों योगीं वियोगीं
हा समाधीयोग दे पीयूष माझ्या जीवनाला
आत्मतृप्ती लाभली, ती गूढ शब्दातीत सारी
काय ती बोलून दावूं तोटक्या शब्दीं ?— कशाला ?

२१ आक्टोबर १९३०
फलटण

सं. क्रमांक ७०७४
सं. काव्य नं. ३०८७
ता ७।७।७४

वृत्त–शार्दूलविक्रीडित

## ओवाळणी

काही जन्मऋणानुबन्ध म्हणुनी एकत्र आलों असे
काही भाव निगूढ दिव्य, म्हणुनी हा पूर गे येतसे
काही स्वार्थ निरोधितां परसुखीं सौख्यासवें लाभलीं
झालों आपण आपले, अतुल ही घे शुभ्र मुक्तावली

९ नोव्हेम्बर १९२३
पुणें

## तेढ

छन्द– चन्द्रकान्त

[ प्रेमकलहानन्तर साहजिक झालेली अबोल्याची दीर्घ शिक्षा सहन न झाल्यामुळें व्याकूळ झालेली एक व्यक्ति दुसरीच्या सहभावनेची याचना कशी करते, ही या कवितेची पूर्वभूमिका आहे. ]

किती पाहू वाट तूझी लागे जिवा वेड । बाई
अजूनी का नाहीं गेली अन्तरीची तेढ । बाई

कसें गेलें बोलूनी मी आला किती राग । बाई
कुठवर जीवा आता लावणार आग । बाई

कशी आली वेळ तरी ! बसे कसा ताण । बाई
परतवूं कसा आता सुटलेला बाण । बाई

घाव लागे तुज आणि झालें मी घायाळ । बाई
आंसवांनीं भडके हा पेटलेला जाळ । बाई

समजावूं तरी कशी ! झाला निरुपाय । बाई
विझणार कशी जीवा लागलेली हाय । बाई

व्याकळून गेलें सख्या ! काय देऊं मोल । बाई
ऐकूं येतील का कधीं दिलरुब्याचे बोल । बाई

८ फेब्रुवारी १९३२
फलटण

## जीवितेश्वरीस

गज्जल–सुनीत वृत्त–भिल्लीण

तूं एक जिवा शान्ति दिली प्रेमळ भावें
चित्तांत तुझें स्तोत्र किती घोळुन गावें !
हा भोंवति जञ्जाळ जिवा जाळित जाई
येतांच तुझी बोलसुधा, चित्त विसावें
तापून किती जाय शिरःप्रान्त उन्हानें
तूं वेल, चढूनी वरती छत्र धरावें !
सावेग खळाळून जळें लोचनिं येतां
तूं संयतचित्तें पदरीं नेत्र पुसावे !
अस्वस्थ करी घोर जिवा विश्वतमिस्रा
हासून किती गोड जगा तूं उजळावें
लागून जिवा आग किती होय कहाली
कां शब्दपयःस्रोत तुझा आज दुरावें ?

ही कोण हृदीं कोमल छेडी स्वरमाला ?
का भाव तुझा येउन रूपान्तरिं, पावें ?

२२ जुलै १९३३
फलटण

## जादुगिरी

जाति–प्रणयप्रभा

लाभतें मला तें तुझ्या घरीं
इतराच्या लाभे न पांखरीं ॥ ध्रु० ॥

आग पसरती हे भवताली
हृदयाची करितात कहाली,
चटके देउन जनता थाली
शमवि परी तव वचनझरी १

विद्ध जाहल्यें जरि वनहरिणी
रक्त ठिबकवी कसातरणी
पडतां येउन परि तव चरणीं
इक्पात करी जखम बरी २

तुटल्या तारा, सूर बिनसले !
चुकून केव्हां आणि निसवले
सहकम्पाविण सकल विरसले !
मिळे माधुरी तुझ्या स्वरीं ३

कितीहि पेटो, म्हणुनी, वणवा
घायाळ असे करोत शर वा
हृद्वीणा हो बेसुर अथवा
जिववि तया तव जादुगिरी ४

२६ मे १९३२
फलटण

## एकेरी सम्बोधन

जाति–मुद्रिका

[ मैत्रीमधें पहिला काळ अहोजाहोचा असला, तरी ती दृढ होतांना एकेरी सम्बोधन वापरण्याचा काळ येतोच; त्यावेळीं काय वाटतें, हें या कवितेंत चित्रित केलें आहे. ]

किति धन्य वाटते जिवा श्रवुनि आजला
सम्बोधन हें एकेरी, देतांच मधुर तूं मला ॥ ध्रु० ॥

प्रीतीच्या नव कळिकेंत आजवर जरी
गुङ्गलों एक भावानें उपचार न सोडी तरी
एकत्र असुनि वेगळे
नान्दलों कसे नाकळे
मृदु अन्तःपट बाजूस आज जाहला १

धगधगली भवती आग निराशानळीं
गारवा एकला लाभे तव हृदयामधल्या जळीं
डुम्बाया त्यामधिं किती
लोभून हि बुजली मती
परि लोपे कातर कम्प अन्तरातला २

संवादी तारा जोड, मिळाल्या जरी
झङ्कार निराळा लागे संमीलन व्हाया परी
एकीस झणत्कारितां
सहकम्पे दुसरी अता
राहून अलग एकत्र सूर पावला ३

ध्वनियन्त्राची तबकडी मूक गिरगिरे
स्वर टांचणीस बिलगेना, जंव ती न जराशीं फिरे
आलाप अता सुस्वर
बाहेर निघे मधुतर
कीं स्थायी मज हा षड्ज गोड गवसला ? ४

वर्षली वचांची मधुरभाव चन्द्रिका
नाहलों, स्वीय फुललेली निरखीत सुमनवाटिका
होऊन परी स्नात मी
एकान्तीं राहे तमीं
सर्वत्र किरण तेजाळ आज पोंचला ५

११ डिसेम्बर १९३१
फलटण

## उध्वस्त संसार

चाल—प्रतिकूल होइल कैसा

कशी माझ्या संसाराची केली त्यानें माती ! ॥ ध्रु० ॥

प्रीतिसाठीं भारावलों
प्रीतिगानीं वेडावलों
प्रीतिपुष्पांत गुञ्जलों
ठावें काय फुलामाजीं वसे सर्पजाती ! १

तटिनीची येतां लाट
अन्तरङ्गीं दिली वाट
समसमां पडे गांठ
तटानेंच गदूळून टाकावी का कान्ती ! २

चन्द्रकला मोहरली
सुधा थोडी वरसली
गोडी जरा आसावली
काय तींतूनीच यावें हालाहल हातीं ! ३

रम्य तेज तारकेचे
जीवन हो हृदयाचे
भाव तयावर नाचे
हाय! कसे घोर जाळ तिथे उफाळती ! ४

साहूनीया दाह परी
जीव धावे वेड्यापरी
कोण प्रीतीला आवरी ?
धांवण्यातली सेवीतों एक तऱ्हा शान्ती ! ५

१४ मे १९३४
फलटण

छन्द-ओवी

## तन्मयता

[ उषा व **अरुण** हीं परस्परानुरक्त आहेत हें कळल्यावर त्याचा कौतुकगर्भ हेवा करणारी **लता** अरुणापुढे उषेच्या तन्मयतेचें वर्णन करून त्याला तिचें कारण विचारीत आहे, ही या कवितेची पूर्वभूमिका आहे. ]

कशी देई कान, पहा, तुझें निघतां बोलणें
किती सानन्द डोलणें

काम थाम्बे हातातलें, आतुर ती किती होई
तहानेली पाहे पोई

नाव तुझें साभिमान घेतां, किती भारावते
डोळां सुमन दंवतें

# फलभार

बोलतां मी काही, छटा मुखीं वाहे कशी त्याची
बिम्बें जळांत ढगाचीं

तुझ्या सुखीं हसूं ओठीं, दुःखीं आसवांचा सडा
ऊन, पाऊस कीं खडा !

तुझा पुरुषार्थ साङ्गतांच रोमाञ्चते तनू
अभिनन्दन तें जणूं

थोरवीचें तुझ्या काही, कुणी बोलतां गौरवें
नेत्र मिटतात भावें

कशी राहून अबोल, तुझें वर्णन ऐकवी
मूक गाई भावकवी

काय जादू तरी अशी तुझी तिजला भारीते-
आणि ताप निवारीते ?

७ जुलै १९३२
फलटण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

जाति-भूपतीवैभव

## स्मृतिस्थळ !

[ पूर्ववयांत आपण एखाद्या स्थलीं भावी आयुष्याचे किल्ले उभारावेत व दुर्दैवाच्या एकाच फटकाऱ्यानें ते पार ढासळून जाऊन, आपणांस इतरत्र कुठे तरी आयुष्य कण्ठण्याचा प्रसङ्ग यावा आणि कालान्तरानें पुन्हा त्याच स्थलास भेट देण्याचा आपणांस योग यावा; अशा मनःस्थितींत आपणास काय वाटतें, ही या कवितेची भूमिका आहे. ]

येथेच गाइलीं असतीं आपण गाणीं
ऊर्जस्वल भरुनी स्फूर्ती रानोरानीं ॥ ध्रु० ॥

लाभली जिवाला येथे प्रेमळ जोड
लागले निघाया संवादी स्वर गोड
तरळली पुढें मधुसृष्टी, लावुन ओढ
परि कशी निमाली मोहनसुन्दर वाणी !

# फलभार

म्हटले की आपण फुलवूं येथिल गवतें
जोमांत भरू सौन्दर्य नवें लवथवतें
लागेल चराचर नाचायाला भंवते
का एकाएकी शिशिर विकळता आणी !

म्हटलेंस मला चण्डोला भार भरारी
फेकून लकेरी जीवा मोहविणारी
घेतांच तान वर्षली स्मितें सोनेरी
घायाळ कुणी का तोंच करावें वाणी !

ओसाडित तेव्हा स्फुरले मञ्जुळ सूर
सौन्दर्यहि इथलें आज गमे भेसूर
अज्ञातपणींही लाभे मधु हुर्हूर
कीर्तीनें होई हृदयीं आज निशाणी !

ही फुलली सृष्टी परि वाटेच उदास
हा शीतळ वायू वाढवि ऊष्णश्वास
वाढविती पोटीं आग पूर्विचे भास
का जन्मभरी ही गाणें एक कहाणी !

७ नोव्हेम्बर १९३१
बुधगांव — फलटण

## रसिक संशयग्रस्ता

गज्जल–सुनीत–अगोठ

१

तीः–

सुरेख रम्य लिहीतां कशी तरी कविता,
कसें उचम्बळवीतां जळास ऐकवितां ?
कुठून भाव मजेचे तरङ्गतात मनीं ?
कुठून नाजुक येते मनोज्ञ कल्पकता ?
सवेग जाय भरारी नभांत उन्च कशी
प्रतिक्षणीं कुठुनी येई कल्पनानवता ?
वदे कशी रसना शब्द सार्थ ओघवती
सुरेल मोहक वाहे कशी तिथे सरिता ?
कसे तरी मिळती रङ्ग इन्द्रकार्मुकिचे
कशी मनांतिल गूजें अचूक रङ्गवितां ?
कुठून जादु मिळाली लिहावया गुपितें
असे तरी वश का यक्षिणी कुणी वनिता ?

खरीं वचें अनुभूतींतुनीच ना निघती ?
मिळे कुठे मग ती ? साङ्गण्यास का बुजतां ?

२

कशास आज व्हाणे ! परान्तरीं शिरतां
न्यहाळितां, मग तेथे हळू हळू रमतां
रमून तेथ कधीं का उगाच बैसतसां
मिळेल तें परवान्याविणें झणीं लुटतां
अलोट आणुनि हें स्तेय ठेविता हृदयीं
पुनःपुन्हा कधि काढून तेंच तें बघतां
पुन्हा कधीं तरि माण्डून तें पुढें अपुल्या
तयास लौकिक शब्दांशुकात साठवितां
जनांत आणिक जाऊन तें सुरेलपणें
स्वयेंच भाविकतेनें म्हणून दाखवितां
अशापरी चतुराई करून गुप्तपणें
कृतीस या म्हणता ' शिष्टता ! कलात्मकता ! '

फसो जरी फसलें मी; जना नका फसवूं
विमुग्धता तव साङ्गे नसोचि ही शुचिता !

३

तोः— सखे ! मनांतिल माझ्या किती खरें वदसी
विरोध काय मला ये तया कधीं करितां !
परान्तरीं शिरलें चित्त काय त्यास करूं ?

# फलभार

जडून तेथ रमे ही निसर्गयोजकता !
लुटी अनेक मिळाल्या; सुदैव थोर किती !
किती तरी मन ओढी अशी प्रिया वनिता
झुरूनियां तिजसाठीं कितीक वेळ, सखे !
रमावया मन जाई तुलाहि ना कळतां
न चोरट्या अनुभूतींत का अपूर्व रुचि ?
लिहून ऐकविणें ती न का कलात्मकता ?
कितीक नाजुक गूजें तिच्या हृदीं मिळती
कधीं तिचा मज फोटो स्व-भाव-निर्मळता

नको चपापुं अशी ! ही पहाच काव्यकला
दिसेल ती तुजला दर्पणीं स्वयें बघतां !

२८ सप्टेम्बर ३२

फलटण

## संशोधकास

सुनीत—शार्दूलविक्रीडित

संसारीं रमले अनेक अपुल्या, स्वार्थामधें लोभुनी
झाला तो न कधीं सुखावह तुझा किंवा कधीं नेटका
आकाङ्क्षा न कधी इथें स्वमनिंची राहे तुझी थाम्बुनी
कांहीं आन्तर ओघ ओढुन पुढें नेई तुला चेटका
राष्ट्रप्रेम मनामधें रुजुनिया केली तपस्या तुवां
लावोनी मन एकतान अपुलें तूं वेंचलेस क्षण
स्वानन्दीं रमलास आणि चुकला तूं जोडिलासी दुवा
झाले लख्ख किती घनान्धतिमिरीं येतांच तेजःकण
तूं जी वाङ्मयमन्दिरें उभविलीं साहून वारा उन
त्यांचें वैभव पाहण्या निमिष तूं व्हावेंस होतें इथें
आहो हीन परी अम्हींच; तुजला चौबाजुंनी वेरुनी
भासाला भुलुनी गमावित बसूं हातांतलीं शाश्वतें
जेव्हां वैभव जाणते जननिचें येतील पाहावया
कीर्तीची पहिलीच माळ तुजला जातील वाहावया

१६ सप्टेम्बर १९३३
फलटण

## खुळा पाऊस

चाल—छन्द—कोकिळा.

पाऊस खुळा । किती पाऊस खुळा
शिम्पडून पाणी आई भिजवी फुला ॥ ध्रु० ॥

नाचे किती वेड्यापरी
बडबडे काही तरी
झोडपतो उगाच हा वेलीच्या मुला ! १

दीनवाणी वेलीबाई
पाङ्धराया नाही काही
काय करू उघडा हा राहे छकूला ! २

## फलभार

उचलून आणूं काय
पुसूं डोकें अङ्ग, पाय
काकडून गेला किती बघ माकूला ! ३

निजवूं या गादीवर
पाङ्घरूण घालूं वर
देऊं काय साङ्ग आई आणून तुला ? ४

काय—नको तोडूं फूल
वेल-पावसांचें मूल ?
ऊन येतां चमकेल त्याचा डोळूला ५

आणि येऊं मी घरांत ?
भिजूं नको अङ्गणांत ?
नको आई—चमकेन मी ही आपुला ! ६

मज वेडा म्हणतील ?
फूल शहाणें होईल ?
मग वेडी म्हणतील सगळे तुला ! ७



श्रीमन्त युवराज प्रतापसिंह महाराज

सं फलटण

## मङ्गलाशीर्वाद

वृत्त—शार्दूलविक्रीडित

[ श्रीमन्त युवराज प्रतापसिंह बापूसाहेब महाराज स. फलटण यांस त्यांचे उपनयनसमारम्भाचे वेळीं दिलेले आशीर्वाद. ]

ज्यांनीं थोर दिगन्त कीर्ति करुनी सम्पादिलें वैभव
त्यांच्या उच्च कुलीं तुम्हांस घडला पुण्याइनें सम्भव
त्यांना जीं कुलदैवतें निशिदिनीं देऊनि गेलीं बल
प्रेमें आज करावयास तुमचें येवोत तें मङ्गल

ज्यांनीं गाजविले पराक्रम रणीं समशेर धारेवरी
शालें छत्रपती निबद्ध म्हणुनी ज्यांशीं घरीं सङ्गरीं
ज्यांचे शाश्वत भाव, पूर्वज असे गर्जून दिङ्मण्डल
प्रेमें आज करावयास तुमचें येवोत तें मङ्गल

ज्यांनीं बोल रसाळ देउनि जनां भावामृता पाजिलें
झाले सन्त कवीश भागवत जे ज्ञानेश तेजोबलें
वाणी पावन अन्तरास करिते ज्यांची नितान्तोज्ज्वल
प्रेमें आज करावयास तुमचे येवोत ते मङ्गल

औदार्यें स्वजनांस पूर्ण करिती स्वायत्त, मातापिते-
ऐसे थोर रसज्ञ धार्मिक तुम्हा संसारसङ्गोपिते
ज्यांचे प्रेमळ भाव आजवरचे रोपास झालें जल
प्रेमें आज करावयास तुमचे येवोत ते मङ्गल

विद्या-नीति-कला-स्वधर्म-गुरु जे मार्गामधें लाभले
दृष्टी विस्तृत जे करून, हृदया देतील शान्ती भले
दीर्घायुर्बलवैभवें वितरितीं ज्यांचीं वचें निश्चल
प्रेमें आज करावयास तुमचे येवोत ते मङ्गल

२२ मे १९३२
फलटण

[library stamp]

## होळकरांस जन्मभूमीचा आशीर्वाद

जाति–प्रणयप्रभा

[ होळकरांचें होळ-मुरूम हें गांव फलटण संस्थानमधें नीरा नदीचे कांठीं आहे.]

अभिवादन तुजला हे नृवरा
कुळभूषण होई होळ-करा ॥ ध्रु० ॥

पिउनि निरेचें जळ मल्हारी
येथुनि मारी दूर भरारी
भरी यशानें धरणी सारी
कौतुक वाटे जन्मधरा १

जोडुन धर्माची पुण्याई
महोदारता ठायीं ठायीं
पटवी देवि अहल्याभाई
खळ न जिच्या पावित्र्यकरा २

गुणिल रत्न तू अशा कुलाचें
मराठियांच्या अभिमानाचें
तेज मनोमय मम जीवाचें
  विराज तूं कोन्दणीं हिरा ३

रवि तूं, तू वर्षा, तू जीवन
पालव बाळा वठलेलें वन
पुण्यफळानी जातां डंवरुन
  वाण न चैतन्यास जरा ४

कृष्णातटिची कणसें खावीं
वर नीरेची ओंझळ प्यावी
आणि भरारुन वृत्ती जावी
  श्रवुन पुण्याची स्फूर्ति-गिरा ५

स्मरतां उज्ज्वल या इतिहासा
वाटे कष्टी जिवा दिलासा
शमवि जिवाची एक पिपासा
  जागवि ती कुलपरम्परा ६

१ सप्टेम्बर १९३३
होळ–फलटण

## धर्मवीर !

जाति-दिण्डी

मुखीं लावुनि टक टाकुनी उसासे
दीनवदना ती जरा जवळ बैसे
आणि त्याच्या डोळ्यांत अश्रुधारा
शब्द ओठीं—सम्पला खेळ सारा ! १

तिच्या प्रेमाचा बाग वठुन गेला
क्षणीं झालें ओसाड विश्व तीला
हृदय उललें ! आकान्त घोर झाला !
जणूं झाला भूकम्प तो जिवाला ! २

हाय ! गेली ती व्याकळून दुःखीं
गांव हादरलें तिच्या घोर शोकीं
मुखीं त्याच्या किति कान्ति अजुन खेळे
कुणी वसनें तों त्यास झाकियेलें ! ३

पुसे कुणि तो हळु—' कां अतां उशीर ? '
' आंत जाउनि या ! ' वदे धर्मवीर
तिच्यापाशीं तों जाउनिया कोणी
' तुझे मङ्गलसूत्र दे ! ' वदे वाणी ! ४

शब्द ऐकुन मूर्च्छना तिला आली
आणि त्यानें ती वेळ साधियेली ! ५

२१ जून १९२३
पुणें

## हिन्दवन्दना

वृत्त-बांसरी

[ बालवीरांचे प्रवासगीत ]

हिन्दबन्धुनो चला करीत हिन्दवन्दना
गौरवू तिला कृती करून वीरनन्दना !
भक्तिनेच आळवू
अन्तरास मळवू
वैभवीं विराजवू करून दूर बन्धना।

१९ जानेवारी १९२४
पुणें

## माझी शाळा

वृत्त–शिखरिणी

तुझें जेव्हां जेव्हां सहज मजला दर्शन घडे
स्मृतींचे पूर्वीच्या फलक पुढती राहति खडे
हृदीं भारावोनी गुणगुणत मी त्यांत रमतों
तरङ्गूनी भावें विनत हृदयें तूज नमतों १

किती होता तूझा उगम अगदीं सान, नगरीं
जणू रानांतील स्फटिकधवला निर्मळ झरी
अता विस्तारें या मन कुतुकुनी येथ खिळतें
नदीच्या सौन्दर्यें अतुल सुख नेत्रांस मिळतें २

तुझीं बाळें, तूझे गुरुवर, तुझे सेवक मला
सदा पूज्य; प्रेमें तुजवर असे जीव जडला
तुझ्या उत्कर्षातें श्रवुनि हृदया येइ भरतें
तुझ्या त्यांच्या गावें सतत पुरुषार्थास गमतें ३

## फलभार

गुरूचें तूं माझ्या असशि मधुर स्वप्न, सुभगे !
मन:सौन्दर्याचा सुखमधुर कीं ताजच बघे
कणातूनी तूझ्या अतुल दिसते वृत्ति विमला
गमें ठायीं ठायीं गुरुहृदयिंचा भाव रमला ४

तुला होवो वा न स्मरण मम, माते ! परि मनीं
स्मृती माझ्यासङ्गें मधुर तव मी नेइन जनीं
तुझी थोरी सर्वां पटवुन सदा देइन मुखें
तवाशीर्वादानें मिळतिल मला आन्तर सुखें

११ मार्च १९२९
सातारा

## ध्येयदर्शन

गज्जल-सुनीत वृत्त-वारुणी

अन्तरीं बाहेर सारें शून्य झालें का कळेना
दाटली हुर्हूर पोटीं का, जिवाला आकळेना!
रङ्ग आकाशीं मजेचे खेळती अस्ताचलीं हे
पाहतां नैराश्य वाढे, ओघ तेजाचा वळेना!
वाहतो ओढा खळाळा गाउनी हेमन्तगाणें
वाढते तों अन्तरींची लाट आवेगें, चळेना!
बालकांचा खेळ चाले वाळवण्टीं किल्बिलाटें
पाहुनी दृश्यें परीचीं सौख्य जीवा कां मिळेना!
लोचनीं कोन्दाटली भेसूर ऐशी का तमिस्रा
पाहतां कोठें, कसेंही शून्यवृत्ती पाजळेना!
ओढली जाते अशी का आत आपोआप दृष्टी
दाटलेली अन्तरींची लाट का ही ओघळेना!
कोठुनी हा झोत आला? मूर्त कैशी स्पष्ट झाली?
गोड आनन्दी लकेरी नर्तली-आता खळेना

२६ जुलै १९३२
फलटण

## चहाचें तबक*

वृत्त—वसन्ततिलका

मेजावरी तबक शुभ्र तयांत पेले
हे शोभतात किति माण्डुन ठेवलेले
आहेत सुन्दर किती चमचे रुपेरी
बोटासवें करिति गोल चहांत फेरी

वाटे न तें तबक सागर शुभ्र हाले
नावा तरङ्गति तयावर, ते न पेले
वल्हीं सुरम्य, नच ते चमचे चहात
खालीं वरी भंवति वल्हवितात हात

३ आक्टोबर १९२९
पुणें

---

* ही कविता Mother's Tray या पुढील इङ्ग्रजी कवितेचें रूपान्तर आहे.

I think that mother's silver tray
When it is spread for tea
Reminds me very often of
The shining glistening sea

The tea-cups are the little boats
The spoons are the oars, you know
And round about and up and down
They very often row

## आनन्दांतील दुक्खाश्रु

जाति–दिण्डी.

तार आली ‘ उत्तीर्ण तुम्ही झालां–
सुयश आहे लाभलें आपणांला ! ’
निमिष खळबळ हृदयांतली निमाली
नवी कांहीं अनुभूति गोड आली

‘ किती केले श्रम रात्र जागवून
आणि कष्टाचा दाम घालवून
किती दिधला भंवतिच्या जिवा ताण
कितीकांचे उपकार, न प्रमाण ! ’

अशा होता कायशा विचारांत
लाट हेलावे तोंच अन्तरांत
आणि मानाची कुणी पुष्पमाला
गळां घाली आणून त्याच काळा

# फलभार

मोंवतींच्यांना हर्ष किती झाला
परी त्याच्या ये खिन्नताच भाला
खिळे दृष्टी मग कुठे दूर दूर
लोचनान्तीं थबकला अश्रुपूर

ओठ थरथरुनी लागले वदाया
रुद्धकण्ठीं जाहले यत्न वाया
'कष्टली ती ! ..बघण्यास आज नाही !'
वदुनि, संयमिले अश्रु तयें काहीं

१८ जून १९३१
फलटण

## प्रियदर्शन

जाति-दिण्डी.

[' ही मुलगी थेट आईसारखी दिसते ' असें अगदीं लहानपणापासून जनतेकडून ऐकत आलेल्या एका गतमातृक तरुण कन्येला, तिच्या आईचें दर्शन एकदां कसें झालें हें पुढील कवितेंत रेखाटलें आहे. ]

" किती मातेसम हुबेहूब ताई
 सान रूपीं जणु मूर्तिमन्त आई! "
असें म्हणती मज सगेसोयरे कां,
 बाल्य कालापासून येइ शङ्का

कुणी ठेवण दावून कपाळाची
 कुणी निरखूनी घडण नासिकेची
ओठ कोणी, कुणि दांत, कुणी डोळे
 ' थेट आईसम! ' बघुन मला बोले

बघुन माझें हासणें बोलणें वा
 कशीं भावण्डें बिलगतात, देवा!
आणि पातळ नेसून ऐटदार
 चालतां, कां निःश्वसिति तात फार!

कधी जाणीव न होय मला याची
 आणि ' आईसम! ' म्हणति काय, त्याची

स्थळ प्रत

## फलभार

तिच्या स्मरणें मत्चित्त मात्र पोळे
आणि एकान्तीं पुसे नेत्र ओले

साञ्ज झाली सहलून एकली मी
परत आलें कॉलेजवसतिधामीं
थेट शिरलें खोलून दार, आंत,
दिसे आई पुढतीच तों पळांत !

काय झालें पोटांत—! कथूं काय !
धीर धरुनी परि पुढें हळुच जाय
करीं बिजली लावून पाहियेलें
बिम्ब आदर्शी जननिचेंच ठेलें !

कसें कौतूहल वाटले जनाला
काय भावण्डा बोध मुग्ध झाला
काय बाबांना बघुन मला झालें
अन्तरीं हें मज सर्व कळुन आलें

३१ जुलै १९३३
फलटण

## आकाशलिम्ब

सुनीत–शार्दूलविक्रीडित

जातां श्रावण वर्षुनी, उमळला भावार्थ अभ्यन्तरीं
पानें दाट कळ्या फुलें डंवरलीं हीं लाम्ब तूझ्यावरी
जाशी लागुन ओढ उन्द वरती, होऊन आकर्षण
आकाशांतुन होतसे मग कधीं तूझ्यावरी वर्षण

दारीं होय सदा मनोहर किती हा दाट तान्यापरी
जाळें हास्यमुखी सुदन्त अथवा हंसावली साजिरी
किंवा लेवुनि वेश शुभ्र युवती नाचावया अङ्गणीं
आल्या थेट वरून फेर धरुनी, अन् श्रान्तल्या रङ्गणीं

जाई कल्पतरु मनातिल असा माझ्या कधी अम्बरी
होई त्यावर शिम्पणें वरतुनी आसावतां अन्तरीं
येती दाटुन भाव आणि कलिका हासावया लागुनी
पुष्पें सुन्दर त्यावरी लटकतीं, दारीं सदा होउनी

वेंचूनी तव हीं फुलें, प्रभुवरा पूजी कुणी भाविक
कामीं येतिल का मदीय म्हणुनी मी होय पर्युत्सुक !

२१ सप्टेम्बर १९३३
फलटण

## नाजूक ओढ

सुनीत–वृत्त–गीतिका

स्वर लागले कसले तरी मृदु यावया श्रवणान्तरीं
लहरी अशा हुरहूर का हृदयामधें भरती तरी !
मिटतात लोचन लागतां अशि ओढ नाजुक आंतुनी
कुठली अशी मज भारुनी स्थिर मुग्ध जादु मना करी !

रमणीय भावमनोहरा कळिका नवोदित पाहिली
हळुवार कीं झुळुकी मला तिथल्याच बोलविती परी ?
रिझवून मञ्जुळ तान जी विरली जिवा बिलगूनिया
उठुनी स्मृतींतुन तीच का झणकारुनी हृदया हरी ?

हृदयामधें हृदयांतले नव भाव ज्या स्थलिं ओतले
सहकम्प त्याच हवेंतले फिरतात का भंवती तरी ?
क्रमिले सुखक्षण ज्यासवें सुहृदेंच त्या, हृदयांतली
मज भावजीवन द्यावया पिळिलीच वीणा स्वस्वरी ?

फिरवून आतुर हात सांसव लोचनें वच बोलली–
उठुनीच उत्कट लाट ती, मज न्यावया सजली घरीं

आक्टोबर १९३३
फलटण

## भलरी

भलेऽर, भलेऽर
भलॅरि दादा ! भल गडि दादा ! ॥ ध्रु० ॥

तामंबड फुटल झुन्जूमुन्जू
सुकीर चान्दनि लागली इझूं
थण्ड वात करतुया कुजूंबुजूं
म्होरं हात चालिव जोसांत मर्दा
भलॅरि दादा ! भल गडि दादा ! १

कापरवढ्याचं झुळझुळ पानी
पांखरासङ्गं गाउनुश्यानी
रङ्गविल गड्या खेळियावानी
न्हिरीचा खाउन चल भाकर कान्दा
भलॅरि दादा ! भल गडि दादा ! २

बाच्या किरतीची सुमरून आन
लुटायला जावू मोत्याची खान
उपटुन काढू कणसाळलं रान
चला राव भिडवुन खान्यास खान्दा
भलॅरि दादा ! भल गडि दादा ! ३

## फलभार

शिवारिं जित्राप नागावानी
सळ्सळ् आवाज, डुलती फनी
डुइवर धरलें मोत्याच मनी
कवळुन आनुं या वर्सांचा सौदा
भलेरि दादा ! भल गडि दादा ! ४

कडूसा पडता सम्पल पाळी
ढवळी व्हईल मोकळी काळी
इर्जिकीला मिळंल नळी
काळ्या रातीला फुलविल चान्दा
भलेरि दादा ! भल गडि दादा ! ५

इरवाळ ठिपकाल डुइंच पानी
शिगेल खळं डोङ्गरावानी
भरत्याल् कनगी गञ्जी, रानीं
खात्याल् सम्दी प्वाटभर मलिदा
भलेरि दादा ! भल गडि दादा ! ६

१४ नोव्हेम्बर १९३४
फलटण

## आदर्श

जाति–दिण्डी

[ आदर्श म्हणजे ध्येय ही या कवितेची भूमिका आहे. ]

दिला होता तो तिनें भेट मातें
म्हणुन जपलें मी जिवाशीं तयातें
जिवाभावाची देणगीच थोर
म्हणुन मेजाच्या लाविली समोर १

कधी जातां येतांच त्यात पाही
कधी साक्षेपें दृष्टि तिथे राही
कधी सांसारिक विवञ्चनेंतून
नजर काढुन रोखिली त्यामधून २

## फलभार

कधी होता मन शून्य—जिवा ओझें
आणि कारण नसतांच कधी माझे—
वसति डोळे त्यावरी दृढ खिळून
पूर्ण जाई मी त्यासवें मिळून ३

मला लाभे तो ज्या सुरम्य कालीं
कधी त्याची स्मृति गोड गोड झाली
आणि पुष्पीं फुलपांखरें रमावें
नयन माझे त्यापरी गुङ्ग व्हावे ४

कधी बघतां बघतांच शहारून
अङ्ग येई सानन्द बहारून
कधी भीती, नैराश्य कधी वाटे
कधी औदास्यें हृदय पार फाटे ५

कधी आशेचा भरे नवा जोम
स्फुरित होई अङ्गिचा रोमरोम
सुखीं दुक्खीं परि याच गमे गोडी
दृष्टि रङ्गुन त्याला न कधी सोडी ६

वेड माझें हें त्यांत बघायाचें
स्थान झालें सर्वांस हसायाचें
आणि जावी ही लहर मावळून
म्हणुन करिती ते यत्न फिरफिरून ७

फलभार

एक दिवशीं तो दिसे भङ्गलेला
किती जागीं तो हाय पिचुन गेला !
कुणी केलें हें कोण साङ्गणार !
हाय ! फुटलेलें कसें सान्धणार ! ८

तळमळीचा आवेग आवरेना
आणि फुटका आदर्श सोडवेना
भङ्गलेल्या पाहतों आरशांत
मीच शकलें माझींच—जीवनान्त ! ९

२३ नोव्हेंबर १९३३
फलटण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५९८५

## शोध

गज्जल—वृत्त-गिरिबाला

[ भक्त व ईश्वर यांतील भाव तरुण-तरुणींच्या भावाइतकाच उत्कट असतो व भक्त त्याचा शोध पञ्चमहाभूतात्मक पार्थिवांतून करीत करीत, शेवटीं स्वतांच्या अपार्थिव भावनेंतच करतो, ही या कवितेची भूमिका आहे ]

किति शोधू तुजला मी मजभोंती वनबाले
नच शान्ती हृदयाला मन व्याकूळ जहालें !
वन सारें भ्रमलों मी बघुनी आश्रम आलों
पुतळे पार्थिव सारे मन नाहींच निवालें !
श्रवुनी निर्झरिणींचीं तटिनींचीं जळगानें
भ्रमलों व्यर्थ! जिवाला स्वर तूझे न मिळाले !
नव तेजें नयनांचीं, नव सौन्दर्य फुलांचें
नव कान्ती किरणांची नच न्याहाळुन धाले !
झुळुकींच्या मधु गन्धीं तुज मी शोधित गेलों
हृदया स्पर्श न झाला, तव निःश्वास न आलें !

## फलभार

अवकाशीं तुजसाठीं फिरलों मानसवेगें
परि दृष्टीस न लाभे तव सादृश्य, रसाले !
गुणरूपें अससी या सकलांची अधिदेवी
तुजला शोधित आलों तरि एक स्वरतालें
तव लाभाविण आता मज वेड्यापरि होई
निववाया मन होतों तरि अन्तर्मुख, बाले !

१२ आक्टोबर १९३१
फलटण

## औक्षण

छन्द–ओंवी

उठा राया ज्ञानेश्वरा । निजानन्दाच्या माहेरा
दीन भक्ताचें स्वीकारा । औक्षण हें प्रेमाचें
सरली काळोखाची रात । वाहे पहाटेचा वात
दिशा उजळून पहात । प्रसन्नता पसरीती
परी अन्तरींचें तम । घालवाया सूर्योत्तम
कोण दुजा ज्ञानोपम । हृदयाक्षितिजीं येईल !
गेली स्तब्धता भेसूर । पक्षी गाती मञ्जूळ सूर
हृदयीं गोडवी हुरहूर । भरती सृष्टीमातेच्या
परी भकासलेल्या मनीं । माझ्या भरुनी मधुर ध्वनि
कोण तरङ्गवी गायनीं । प्रेमध्यानीं तुम्हांवीण
गोड भावार्थाची ओवी । तुमच्या सुस्वरें ऐकावी
एकरूप त्यांत व्हावी । अन्तरींची भावना
तरी छेडुन भाववीणा । अनुरागाच्या घेउन ताना
दूर करा उणेपणा । व्याकुळवी जो हृदयातें
तुमचें गाणें; माझी ज्योत । उमटवो प्रेमझोत
औक्षणाचा म्हणुनी पोत । ओवाळी हा भक्तीनें

२२ मे १९३४
फलटण

## अनुताप

छन्द-अभङ्ग.

सङ्कटाचीं रूपें विविध घेऊनी
माझ्या घरांतूनी हिण्डलासी
हातीं धरुनीया नकळतपणें
वाहविलें जिणें नीट मार्गे
धुडकावी त्यास मी निज विश्वासें
तुज प्रीतिश्वासें पाचारून
परी तुझीं रूपें तींच वेगळालीं
कळतां गळाली पूर्ववृत्ती
किती तरी तुवां केलें माझें भलें
कसें न लाभलें ज्ञान याचें!
तळमळ हीच जाळीते अन्तरा
कधी येशी घरा निववाया
सङ्कटरूपानें ये ये वरीवरी
आणिक सावरी मन माझें

१६ आक्टोबर १९२९
पुणें

## लौकिकांत अलौकिक

छन्द–अभङ्ग

तुझी कृपा हेंच माझें समाधान
  अन्तरीं निधान पावलों मी
' सखीनें संसार केलासे नेटका
  भगिनीमित्र दुक्खा नुरवीती
सरस्वती घेई अन्तरङ्गभार
  बोलाचा सम्भार वाढवाया
लौकिकरीतीनें बोलतों मी ऐसें
  विचारितों ' कैसें जाहलें हें ? '
निववी तळमळ मग भावदृष्टी
  ' तव कृपावृष्टी रुजवी हें '
भाग्य माझें थोर म्हणुनी हा लाभ
  तूंच माझा आब राखीयेला
लौकिकाचे बोल जरी साभिप्राय
  अलौकिक माय आंत तुझी

२६ जुलै १९३१
फलटण

## उपकार

छन्द–अभङ्ग

उपकार घ्याया मन सोकावलें
अन्तरीं कावलें, फेडतां ते
वचनाची वाफ सोडितों फुकाची
निष्ठा पाळायाची, मनीं नाही
आणि म्हणवीतों शब्द–सृष्टीईश
ठेवूनीयां वीष जिभेवरी
सत्वभाव सिद्धी घालवितों ऐशीं
खेळतों शद्बांशीं फोलपणें
नको शद्बसृष्टी, नको उपकार
न हा व्यवहार जुळे जरी
आणि शिरीं ऋणें व्हायचींच जरी
तुझीं जन्मभरी वरसूंत

१ डिसेम्बर १९३१
आदर्की–फलटण

## शिक्षा

छन्द–अभङ्ग

विटाळली जीभ केली परनिन्दा
        आजवरी धन्दा हाच केला
वाणीचें पावित्र्य थोर, मळवीलें
        डोङ्गर रचले शद्बाघांचे
शद्बांची किमया मग करूं जातां
        लगडेल हाता काय भाव ?
म्हणूनीया नाम अता मी बोलावें
        व्रत एक व्हावें जीविताचें
नातरी सेवावी मूकतेची दीक्षा
        हीच एक शिक्षा जिवा व्हावी
लङ्घावें डोङ्गर हीच तळमळ
        तरी योगबळ हेंच देई

२७ आक्टोबर १९३१
फलटण

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं.
ता. ...
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५१३७५
REFBK-0005145

## राजगीत

चाल–बॅण्डची

[ फलटण संस्थानचें राजगीत ]

विजय थोर । नृपवरास । सतत देइं । प्रभुवरा
विपुल आयु । विमल कीर्ति । अतुल विभव । शुभकरास
दे स्वराज्य । निजजनास । करुनि सबल । जनकरांस
निर्मुनी सुजीवना । म्हणुनि प्रथम । सुमनहार
या उदारधी नृवरा ॥ विजय० ॥

# पहिल्या ओळीची सूची


अभिवादन तुजला हे नूवरा . . ... ३१
अन्तरीं बाहेर सारें शून्य झालें कां कळेना ... ... ३८
उठा राया ज्ञानेश्वरा ... . . ... ४३
उपकार घ्याया मन सोकावलें .. ... ५६
'कमल'–पुष्पानें तुज पूजियेलें .. . ... ५९
कशी माझ्या संसाराची केली त्यानें माती .. .. १७
कशी देई कान, पहा, तुझें निघतां बोलणें .. ... १९
काय करूं तुलना यांची ... . .. ... १
काही जन्मऋणानुबन्ध म्हणुनी एकत्र आलों असे .. ११
किती मातेसम हुबेहूब ताई ... . ... ४२
किति शोधूं तुजला मी मजभोंती वनवाले ... ५१
किती पाहू वाट तूझी लागे जिवा वेड . .. १२
किति धन्य वाटते जिवा श्रवुनि आजला . ... १५
जातां श्रावण वर्षुनी उमळला भावार्थ अभ्यन्तरीं ४४
ज्यांनीं थोर दिगन्त कीर्ति करुनी सम्पादिलें वैभव ... २९
तव चरणा श्रीज्ञानेशा करि भावें वन्दना .. ... ४
तार आली उत्तीर्ण तुम्ही झालां .. ४०
तुझी कृपा हेंच माझें समाधान ... .. ५५
तुझें जेव्हा जेव्हा सहज मजला दर्शन घडे .. ३६
तुझ्याविण अन्तरीची प्रतिभा फुलेना . २
तूं एक जीवा शान्ति दिली प्रेमळ भावें . १३
तूंच एक अन्तरास दाविला जिव्हाळा ६
दिला होता तो तिनें भेट मातें . . ४८
नजरेंतली तव मोहिनी मज थाम्बवी पथिं मारुनी .. ९